# नियमित फौजदारी खटला क्र.१८४/२०१९ मधील नि.३२ खालील आदेश
# (CNR-MHSN090010212019)

प्रस्तूत अर्ज तपासी अधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६९ आरोपी क्र.८ हिला प्रस्तूत खटल्यातून मुक्त करणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, सदर गुन्हयातील प्रत्यक्ष साक्षीदार सूरज वसंत माने यांनी पोलीस ठाणेत हजर राहून असा जबाब दिला आहे की, त्यांचे शेजारी हरिभाऊ माने व यशवंत माने यांचेत जमिनीच्या कारणावरुन त्यांचे नातेवाईकांसह भांडण चालू होते. त्यावेळी त्यांनी भांडण सोडवून घरी जाणेस सांगीतलेवरुन सर्वजण घरी निघून गेले. त्यानंतर हरिभाऊ माने व सिध्देश्वर माने यांनी एकमेकाविरुध्द तासगांव पोलीस ठाणेत फिर्याद दिल्या. भांडण चालू असताना आरोपी नं.८ कु.चांदणी सिध्देश्वर माने ही सदर ठिकाणी नव्हती व तिने भांडणात सहभाग घेतला नव्हता. तसेच आरोपी नं.८ हिचे मामा प्रकाश विष्णू पाटील रा.हातनूर, ता.तासगांव यांनी घटनेदिवशी कु.चांदणी ही दिनांक ०७.०५.२०१८ ते दिनांक ३०.०५.२०१८ या कालावधीत त्यांचे घरी राहणेस असल्याचा जबाब दिला आहे. तसेच आरोपी नं.८ हिचे चुलते हरिदास माने व वडील सिध्देश्वर माने यांचे जमिनीच्या वहिवाटीवरुन वारंवार भांडणतंटा होत असल्यामुळे दिनांक २५.०५.२०१९ रोजीच्या भांडणामध्ये मुद्दाम आरोपी क्र.८ चांदणी हिचे नांव घेतले आहे. सबब, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६९ प्रमाणे सदर गुन्हयातून आरोपी क्र.८ हिला मुक्त करणेत यावे अशी अर्जदार यांनी विनंती केली आहे.

३. फिर्यादी यांनी प्रस्तूत अर्जास नि.४६ कडे म्हणणे सादर करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. फिर्यादीचे म्हणणे असे की, सुरज वसंत माने हा प्रत्यक्ष घटना घडली त्यावेळी हजर नव्हता व त्याने जखमी व आरोपींना घटना घडलेनंतर पाहिल आहे. त्याचे तपास टिप्पणात त्याने चांदणी माने हिला पाहिले आहे असे आले नाही. त्यामूळे तिने गुन्हा केला नाही असे

म्हणता येत नाही. फिर्यादी, छाया माने व सागर माने यांचे तपासात आरोपी नं.८ चांदणी माने हिने तसेच आरोपी नं.७ व यांनी छाया माने यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ गेल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. फिर्यादी, छाया माने व सागर माने हे घटनेचे साक्षीदार आहेत व त्यांचे तपासावरुन आरोपी नं.८ चांदणी माने हिचा सहभाग स्पष्ट होतो. पोलीसांनी आरोपीस मदत करणेसाठी चुकीचा अहवाल पाठविला आहे. सदर गुन्हा घडला त्यावेळी आरोपी चांदणी माने या त्यांचे मामा प्रकाश पाटील यांचे घरी नव्हत्या. त्यामूळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती फिर्यादी यांनी केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिला. दोन्ही पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा अर्ज तपासी अधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६९ अन्वये आरोपी क्र.८ चांदणी माने यांना मुक्त करण्याकरिता दाखल केला आहे. तपासी अधिकारी यांचे अर्जानुसार प्रत्यदर्शी साक्षीदार सुरज वसंत माने यांनी स्वतः पोलीस स्टेशनला हजर राहून असे जबाब दिला आहे की, भांडण चालू असताना आरोपी क्र.८ कु.चांदणी सिध्देश्वर माने ही भांडणात सहभागी नव्हती. तसेच ती ज्या दिवशी घटना घडली त्यावेळेस तिचे मामा प्रकाश विष्णू पाटील रा. हातनूर, ता.तासगांव यांचे घरी गेली होती. तेथे ती दिनांक ०७.०५.२०१८ ते दिनांक ३०.०५.२०१८ पर्यंत राहिली होती. तपासी अधिकारी यांनी केवळ या दोन साक्षीदारांच्या जबाबाचे आधारे सदरचा अर्ज दाखल केला आहे. दोषारोपसोबत तपासी अधिकारी यांनी दाखल केलेले तपास टिप्पणचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदार सागर हरीभाऊ माने व छाया हरीभाऊ माने हे सदर घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून यांनी त्यांचे तपास टिप्पणमध्ये आरोपी क्र.८ चांदणी सिध्देश्वर माने हिचे नांव स्पष्टपणे घेतलेले आहे. सुरज वसंत माने हे घटनेच्या दिवशी तेथे जरी हजर असले तरी त्यांनी त्यांच्या तपास टिप्पणामध्ये असे सांगीतले आहे की, “सदर भांडणात कोणी कोणास मारहाण केली आहे याबाबत त्यांना काही माहित नाही”. केवळ यांचे जबाबावर अवलंबून राहून आरोपी क्र.८ चांदणी

सिध्देवर माने यास मुक्त करता येत नाही. तसेच तपासी अधिकारी यांच्या अर्जानुसार ती सदरच्या दिवशी तिचे मामा प्रकाश विष्णू पाटील यांचे घरी होती. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रकाश विष्णू पाटील यांचे तपास टिप्पण किंवा इतर कोणतेही जबाब दोषारोपपत्रासोबत दाखल नसल्यामूळे केवळ पोलीस स्टेशनमध्ये त्यांनी जबाब दिला यावर विश्वास ठेवून आरोपी क्र.८ चांदणी सिध्देवर माने यांना सोडता येत नाही. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व फिर्यादी हरिदास यशवंत माने यांचे फिर्यादीनुसार ती तेथे असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. केवळ ती घटनेच्या दिवशी तेथे हजर नव्हती या कथनावर अवलंबून राहून तिला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६९ खाली मुक्त करता येत नाही. ती घटनेच्या दिवशी तेथे हजर होती किंवा नाही ही बाब केवळ पुराव्याच्या आधारे खटला गुणदोषावर चालवून शाबीत होणार आहे. सबब, या सर्वांचा विचार करता नि.३२ कडील अर्ज नामंजूर करणेच्या निष्कर्षाप्रत मी पोहोचले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**:: आदेश ::**

अर्जदार यांचा नि.३२ कडील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Jyotimala Chandrashekhar Gupta

Digitally signed by Jyotimala Chandrashekhar Gupta
Date: 2021.02.03 14:19:23 +0000

**तासगांव.** **(श्रीमती जे.सी. गुप्ता)**
**दि.०१.०२.२०२१** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तासगांव.**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | U.P.Patil |
| Court | : | Jt.Civil Judge Jr.Dn. and Judicial Magistrate F.C., Tasgaon. |
| Date | : | 01.02.2021. |
| Order signed by the Presiding officer on | : | 03.02.2021. |
| Order uploaded on | : | 03.02.2021. |